# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** दि. ०२/०३/२०२२ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. १२३
**{साप्रवि}** चे अनुषंगाने स्टेशनरी घोटाळया संदर्भात सत्तापक्ष नेता यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त समितीचा अहवाल स्विकृत करण्यात आला असुन सदर अहवालानुसार समितीने स्टेशनरी घोटाळया संबंधी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केलेला असुन व अद्यापही या विषयाबाबत आणखी चौकशी होणे आवश्यक असल्यामुळे उर्वरीत पूढील चौकशी ही नियुक्त केलेल्या् समितीतील निवृत्त न्यायाधीश यांचेद्वारा करुन पूढे सुरु ठेवण्याबाबत समितीने शिफारस केलेली होती. त्या अनुषंगाने निवृत्त न्यायाधीश श्री. शेखर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने विषयांकित स्टेशनरी अनियमितताबाबत चौकशी अंती तयार केलेला अंतीम अहवाल मा. आयुक्त यांना सादर केला असुन त्यात प्रामुख्याने मा. अविनाश ठाकरे, यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालात जी माहिती आहे त्या व्यतिरीक्त ठोस स्वरुपाची अतीरीक्त माहिती साक्षीदाराच्या चौकशीमध्ये मिळाली नसल्याची बाब नमूद असुन मनपातील प्रत्येक विभागातील मागील पाच वर्षाच्या कालावधीतील संबंधीत कंत्राटदारांच्या आर्थीक व्यवहारांची आणि प्रदानांची स्वतंत्र सरकारी लेखा परिक्षकामार्फत लेखा परिक्षण करुन घेण्याची शिफारस केली आहे. सदर अहवाल स्वीकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- २५/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २९/०६/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार दि. ०२/०३/२०२२ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. १२३ चे अनुषंगाने स्टेशनरी घोटाळया संदर्भात सत्तापक्ष नेता यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त समितीचा अहवाल स्विकृत करण्यात आला असुन सदर अहवालानुसार समितीने स्टेशनरी घोटाळया संबंधी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केलेला असुन व अद्यापही या विषयाबाबत आणखी चौकशी होणे आवश्यक असल्यामुळे उर्वरीत पूढील चौकशी ही नियुक्त केलेल्या् समितीतील निवृत्त न्यायाधीश यांचेद्वारा करुन पूढे सुरु ठेवण्याबाबत समितीने शिफारस केलेली होती. त्या अनुषंगाने निवृत्त न्यायाधीश श्री. शेखर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने विषयांकित स्टेशनरी अनियमितताबाबत चौकशी अंती तयार केलेला अंतीम अहवाल मा. आयुक्त यांना सादर केला असुन त्यात प्रामुख्याने मा. अविनाश ठाकरे, यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालात जी माहिती आहे त्या व्यतिरीक्त ठोस स्वरुपाची अतीरीक्त माहिती साक्षीदाराच्या चौकशीमध्ये मिळाली नसल्याची बाब नमूद असुन मनपातील प्रत्येक विभागातील मागील पाच वर्षाच्या कालावधीतील संबंधीत कंत्राटदारांच्या आर्थीक व्यवहारांची आणि प्रदानांची स्वतंत्र सरकारी लेखा परिक्षकामार्फत लेखा परिक्षण करुन घेण्याची शिफारस केली आहे. सदर अहवाल स्वीकृत करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**